महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004.
Phone s: Chairman 2690829[O] 2656044[R]Secrtary 2691405[O]2324079[R].
PBX – 2696101,2696102,2696103 FAX :[0231] 2690758 E-Mail :divsec.kop@ gmail.com

**परिपत्रक क्र.कोविमं/शाखा माध्य.परीक्षा/२७५८ / दिनांक २३/१२/२०१९**

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-२०२० नियमित, पुनर्परिक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणी सुधारयोजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...**

**संदर्भ : क्र.रा.मं./परीक्षा-८/६३४८, दिनांक २१.१२.२०१९.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ४६ अन्वये **मार्च-२०२०** मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची **नियमित, पुनर्परिक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची** नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्याची मुदत दिनांक १०/१२/२०१९ रोजी संपली आहे. त्यांनतर दि.११/१२/२०१९ ते दि.२३/१२/२०१९ पर्यंत आवेदनपत्रे स्विकारण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे. सदर मुदत संपल्यानंतरही,

१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी ३० दिवसांचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.५० /- प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारण्यात येते.२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रतिदिन रु.१००/- प्रमाणे विशेष अतिविलंब शुल्क आकारण्यात येते. ३) तद्नंतरच्या १५ दिवसांकरिता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.२००/-प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२, दिनांक ०२.०२.१२ च्या पत्रानुसार ) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारण्यात येते. आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च-२०२० परीक्षा | मंगळवार दि.२४/१२/२०१९ ते सोमवार दि.१३/०१/२०२० | मंगळवार दि.१४/०१/२०२० ते मंगळवार दि.२८/०१/२०२० | बुधवार दि.२९/०१/२०२० ते बुधवार दि.१२/०२/२०२० |

(कृ.मा.प.)

विलंब शुल्कानंतरची अति विलंब/**विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब** शुल्काची आवेदनपत्रे ही माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने,

**www.mahahsscboard.maharashtra.gov.in**

**या किंवा**

**www.mahasscboard.in**

या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (print out) व **परिशिष्ट - अ** तसेच अतिविलंब शुल्क इ. **मंडळ कार्यालयात रोखीने भरावे.**

**(ऑनलाईन फॉर्म ज्या दिवशी भरला आहे त्याच दिवशी फॉर्म व निर्धारीत शुल्क व परिशिष्ट -अ इ. मंडळ कार्यालयाकडे हस्तपोहोच जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर फॉर्म आल्यास ज्या दिवशी फॉर्म मंडळाकडे जमा करणार आहात त्या दिवसापर्यंत अतिविलंब शुल्काची आकारणी केली जाईल याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी. )**

उपरोक्तप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेषअतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे (**परिशिष्ट अ सहीत**) सादर करावयाच्या तारखा आहेत याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. **मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल.** तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घ्यावे.

मा.विभागीय अध्यक्ष किंवा मा.अध्यक्ष राज्य मंडळ यांचेकडे विद्यार्थ्याकडून परस्पर पाठविलेल्या अर्जाचा विचार कला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची शाळेने दक्षता घ्यावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

**सोबत :- परिशिष्ट अ**

**प्रति,**

**सर्व मान्यता प्राप्त शाळाप्रमुख,**
**सातारा /सांगली / कोल्हापूर.**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**-परिशिष्ट - अ-**

परीक्षेचे नांवः-------------------------------

विभागीय मंडळाचे नांव : ----------विभागीय मंडळः----

प्रकरणिका क्रमांक-------------------------------

**विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत शिफारस**

इ. १०वी

१) विद्यार्थ्याचे नांव ---------------------------------

२) शाळेचे नांव व पत्ता ---------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक ---------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्या बाबत खालील कारणासमोर( ) खूण करावी.

**अ** ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार **ब** ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

**क** ( ) नैसर्गिक आपत्ती **ड** ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

**इ** ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१)---------------------------------२)---------------------

३)---------------------------------४)---------------------

५)------------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

---------------------------------------------------------

---------------------------------------------------------

**मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का**

७) **अ)** अतिविलंबाचे एकूण दिवस- ------------ **ब)** अतिविलंबाच्या दंडाची रक्कम------

**क)** दंड कशा प्रकारे भरला - रोख / धनाकर्ष (डी.डी.) / चलन क्रमांक--------------

**ड)** विभागीय अध्यक्षांची शिफारस ------------------------------------

--------------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ व ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,विभागीय मंडळाचे नांव व शिक्का.**